
काव्य ५८९

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५८९

# गवाक्ष–गीत

काशीताई नाटेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ग्रं. नं. ..........
ता. ..........
ठाणें.



REFBK-0004932
REFBK-0004932

' हळूच मारुत । * * * चेष्टा सतिची काय करी । '

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६८३८
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०८२
ता. …………
ठाणे

काव्य ५६१

काव्य १०८२

# गवाक्ष-गीत

REFBK-0004932

काशिताई नाटेकर

६९३७

प्रस्तावना लेखक : श्री. ना. गं. लिमये,
बी. ए., एल्. टी.

४९३२

चित्रकार : कॅप्टन गो. गं. लिमये

प्रकाशक : केमकर आणि मंडळी, बुकसेलर्स,
गिरगांव बॅक रोड मुंबई-४.

किंमत दहा आणे.

प्रकाशक : श्रीकृष्ण दामोदर कुलकर्णी,
केमकर आणि मंडळी, बुकसेलर्स,
गिरगांव बॅक रोड, मुंबई-४.

[ सर्व हक्क लेखिकेचे स्वाधीन ]

मुद्रक : श्री. रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, वाडेकर
बिल्डिंग, मुंबई नं. ४.



लेखिका.

# प्रस्तावना

गवाक्षांत बसून लिहिलेल्या या गीतांचे सूर ऐकूं जाण्यासाठीं प्रस्तावनारूपी 'लाउड-स्पीकर'ची जरूर आहे असें मला वाटत नाहीं; कारण ते सूर स्पष्ट व मधुर आहेत. पुष्पाचा वास समजावून देण्याची वास्तविक आवश्यकता नसते. कदाचित् वाऱ्याच्या झुळुकेप्रमाणें गंधवाहकाचें काम या प्रस्तावनेच्या द्वारें होईल अशी लेखिकेची समजूत असल्यास नकळे. कदाचित् या छोट्या संग्रहाची कवितावधू प्रथमच सासरीं निघाली असल्यामुळें पाठराखीण म्हणून या प्रस्तावनेचा उपयोग होईल असेंही लेखिकेस वाटलें असण्याचा संभव आहे. असो.

प्रस्तुत संग्रहांत सोपीं, चिमुकलीं व चटकदार अशीं सुमारें चाळीसचे वर गीतें देण्यांत आलेलीं आहेत. त्यांत विषयांचें जसें वैचित्र्य आहे तसेंच चालींचें पण आहे. कांहीं बालस्वभावनिदर्शक तर कांहीं विशिष्ट प्रसंगावर लिहिलेलीं आहेत. प्रत्येक गीतांत एकादी तरी चांगली कल्पना आहे व ती कल्पना गीत वाचीत असतां सहजगत्या आकलन करतां येतें. या संग्रहांतील कांहीं गीतें नुकतींच 'मनोरंजन' 'यशवंत' वगैरे मासिकांतून येऊन गेलेलीं आहेत. तथापि बहुतेक गीतें यापूर्वी अप्रकाशित अशींच आहेत. कांहीं गीतांतील विचार वाचतां वाचतां अंतःकरणास तेव्हांच पटतात. कवितेंतील कल्पना आपल्या पूर्वानुभवाशीं जुळली कीं वाचकाला एक प्रकारचा गुदगुल्या करणारा आनंद वाटतो. अनुभूतीची प्रतिमा शब्दद्वारें यथार्थतेनें रंगवितां येणें ही एक काव्यकला आहे. अनुभवकथनाची ही हातोटीच बऱ्याच प्रमाणांत कवितेचा कस ठरवूं शकते. सौंदर्यदिग्दर्शन व भावनांचा खेळ यापेक्षांही या हातोटीस अधिक गुण दिले जातात व या दृष्टीनें ही त्रिविध कसोटी रसिकांनीं या गीतास जरूर लावून पाहावी. हीं गीतें रिकामपणीं खिडकीशीं बसून लिहिलेलीं आहेत.

त्यांत जुन्या कवींप्रमाणें पांडित्यप्रचुरता जशी दिसणार नाहीं तसाच कित्येक आधुनिक कवितांचा उथळपणा पण आढळणार नाहीं असें वाटतें. यांत दोषस्थळें नाहींतच असें नाहीं. तरी एकंदरीनें पाहातां गीतांचा जन्म जरी गजबजलेल्या शहरांतील एका खिडकीजवळ झाला असला तरी वनांतील सहज-सुंदर झाडीखालून वाहणाऱ्या निर्झराप्रमाणेंच त्यांचा ओघ भासतो. या निर्झरांतील अंजलींचे नमुने विस्तारभयास्तव प्रस्तावना-घटांतून न देतां त्यांतील जिवंत पाण्याकडेच वाचकांचें लक्ष वेधणें उचित होईल.

पुस्तकांतील चित्रें रेखाटण्याचें कुशल काम माझे कनिष्ठ बंधु कॅप्टन गोपाळ गं. लिमये यांच्या 'अमॅचूर' कुंचलीनें केलेलें आहे; तें किती सुंदर वठलें आहे हें मर्मज्ञांस सांगणें नकोच. पुस्तकाचा एकंदर उठाव मनोवेधक केल्याबद्दल प्रकाशक अभिनंदनास पात्र आहेत. येवढें सांगितल्याशिवाय हे चार शब्द पुरे झाले असें म्हणतां येणार नाहीं.

मुंबई, ९-९-३२ ना. गं. लिमये.

कै॰ ती॰ सौ॰ मातोश्रीस अर्पण

का० व्य १०८२

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | गळां नाहीं तरि–ठेविं पर्दि | १ |
| २ | भजनी बाहुली | २ |
| ३ | कडक–लक्ष्मी | ३ |
| ४ | द्वितीयेस–पौर्णिमेस | ५–६ |
| ५ | नव्या बाहुलीचें लग्न | ७ |
| ६ | सदू शिवाजी | ९ |
| ७ | लाटांच्या लीला | १० |
| ८ | काय कथुं त्यांसि | १२ |
| ९ | पूर्व–पश्चिमेचें भांडण | १३ |
| १० | घूम् पारव्या घूम् | १४ |
| ११ | अर्धोन्मीलित गुलाब कलिका | १६ |
| १२ | मारुताच्या चेष्टा | १७ |
| १३ | प्रेम | १८ |
| १४ | अरासिक | १९ |
| १५ | सहज–सार्थता | २० |
| १६ | निशेचा स्वैराचार | २२ |
| १७ | गिरणीकामगाराचें स्वप्न | २३ |
| १८ | खूण | २४ |
| १९ | चोरटी सहल | २५ |
| २० | जमना कोळीण | २६ |
| २१ | बकध्यान | २८ |
| २२ | चाल तूं जपून | २९ |
| २३ | संसाराचा उदयास्त | ३० |
| २४ | प्रेमवंचना | ३१ |
| २५ | नलिनीस इशारा | ३२ |
| २६ | मुर्खांचा घास | ३३ |
| २७ | मातृप्रेम | ३४ |
| २८ | आकाश–दिवा | ३५ |
| २९ | डोळस आंधळी | ३७ |
| ३० | दीपगृह | ३८ |
| ३१ | सृष्टि–देवीचें स्नान | ४० |
| ३२ | विश्वाचा पाळणा | ४१ |
| ३३ | कल्पनातीत भाग्य | ४२ |
| ३४ | शकुंत व शकुंतला | ४३ |
| ३५ | रवि व रवी | ४६ |
| ३६ | कालचक्र | ४७ |
| ३७ | उन्मत्त सरिता | ४८ |
| ३८ | हा कुणीं धर्म शिकवीला | ४९ |
| ३९ | भरारी मारणाऱ्या पांखरास | ५१ |
| ४० | स्वर्गावर स्वारी | ५२ |
| ४१ | पिकलें पान | ५३ |

# लेखिकेचे चार शब्द

कविता करावयास लागल्यापासून एक वर्ष झालें असेल नसेल तोंच हा संग्रह प्रसिद्ध करण्याचें हें माझें धाडसच होय. माझ्या आयुष्यांत अपयशाखेरीज कोणत्याही गोष्टीची दुसरी सांगता मला ठाऊक नाहीं तरी पण माझ्या प्रेमळ व उत्साही स्नेही–सोबतीणींनीं उत्तेजन दिल्यामुळेंच मी हें साहस करून वाङ्मय-क्षेत्रांत माझें पहिलें पाऊल टाकीत आहें.

श्री. ना. गं. लिमये, बी. ए., एल्. टी., ॲक्टिंग सेक्रेटरी मुंबई म्युनिसिपल स्कूल्स कमिटी, यांनीं कित्येक उपयुक्त सूचना केल्या व वेळांत वेळ काढून या संग्रहाला आनंदानें प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे कितीही आभार मानिले तरी थोडेच होतील.

रा. रा. बाळकृष्ण वामन फाटक ( कर्ण, धर्म वगैरे पुस्तकांचे कर्ते ) यांनीं मोठ्या हौसेनें सर्व हस्तलिखित तपासून अनेक सुधारणा सुचविल्या याबद्दल मी त्यांची फार आभारी आहें.

श्री. पु. दा. कुळकर्णी, हेडमास्तर, म्यु. म. शाळा मुगभाट यांनीं अतिशय परिश्रम घेऊन या पुस्तकासंबंधीं हरतऱ्हेनें मदत केली हे त्यांचे उपकारच होत.

तसेंच सुप्रसिद्ध विनोदी लेखक कॅप्टन लिमये, एम्. बी. बी. एस्., बी. एच. आय. यांनीं फावल्या वेळांत अत्यंत तसदी घेऊन या पुस्तकाकरतां आंतील व बाहेरील सुंदर चित्रें काढून दिल्याबद्दल त्यांचेही मी आभार मानिले पाहिजेत.

आणि ज्यांनीं ज्यांनीं मला ह्या कामीं उत्तेजन दिलें व आनंदानें सहाय्य केलें त्या सर्वांची मी ऋणी आहें.

माझी ही अल्प सेवा वाचक गोड करून घेतील अशी आशा आहे.

**काशिताई नाटेकर.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६९३७
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. काव्य नं. 9062
ता.
ठाणे

# गवाक्ष-गीत

## ( १ ) गळा नाहीं तरि-ठेविं पदिं

हृदय-उद्यानीं सहज फुलें आलीं ।
विकसतां तीं म्यां सूत्रिं गुंफियेलीं ।
गंधविरहित ही निरस पुष्प-माला ।
प्रभू ! वाहूं का सांग तव पदाला ॥ १ ॥

जननि बालाचे दोष मुलिं न पाही ।
अल्पकृति हो जरि तुष्ट मनें घेई ।
मनोभावें मी अर्पियतें माला ।
गळां नाहीं तरि ठेविं पदिं दयाला ॥ २ ॥

का. क्र. 4632

ऑक्टोबर, १९३२

## ( २ ) भजनी बाहुली



मामा गेला जत्रेला ।
घेइ बाहुली विमलेला ॥
झांज शोभते तिच्या करीं ।
पोट दाबितां भजन करी ॥
' विठ्ठल कां ही वदत नसे ' ।
म्हणुनी सकलां विमल पुसे ॥

विमल तिला घेऊनि करीं ।
नेउनि दावी शेजारीं ॥
घेतां कटिवरि तिज थाटें ।
कौतुक बालेला वाटे ॥
हर्ष तिला हो किती तरी ।
क्षणभर ना तिज ठेवि दुरी ॥
होइ बालिका निद्रिस्त ।
धरुनि बाहुली हातांत ॥

२०-२-३३

## ( ३ ) कडक लक्ष्मी

आली आली ।
चाबुकवाली ।
मळवट भालीं । हळदीचा ।
त्यावरि ओढी कुंकुम पट्टे । थयथयाट करि नृत्याचा ॥ १ ॥



चाळ पायिंचे ।
घुंगुर कटिंचे ।
नाचतांच ते । रुमझुमती ।
डुमडुम वाजे पहा ढोलकें । घेई गिरकी सभोंवतीं ॥ २ ॥

ल्याली बघ ती ।
अंगाभवतीं ।
वसनें हीं किति । रंगाचीं ।
मागें पुढती छुम छुम नाचे । कमान लववुनि अंगाची ॥ ३ ॥

चाबुक हातीं ।
कसा ओढि ती ।
पाठीवरती । फडाफडा ।
अंगावरती वळ ना उठती । ढोल वाजतें तडातडा ॥ ४ ॥

धर्म कराया ।
भोळ्या बाया ।
येती तांदुळ । घेवोनी ।
हात जोडुनी तिजला नमिती । लक्ष्मी दैवत मानूनी ॥ ५ ॥

तिच्या मागुतीं ।
मुलें धांवतीं ।
चाले लक्ष्मी । अशि थाटें ।
येतां द्वारीं कडकलक्षुमी । गंमत बाळां बहु वाटे ॥ ६ ॥

शकू सानुली ।
परि घाबरली ।
आंत पळाली । लपण्याला ।
घट्ट बिलगली मग आईला । ओढि मुखावर पदराला ॥ ७ ॥

१८–१२–३२

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.........
ठाणे



## ( ४ ) द्वितीयेस

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं..........
ता..............
ठाणे

बाळू वदला ।  
चांदोबा बारिक झाला ॥  
ताप यास कीं न कळे आला ।  
म्हणुनी वाटे बहुत रोडला ।  
कोण वैद्य दे औषध याला ।  
सांग मज आई ।  
चांदोबा बारिक होई ॥ १ ॥

आधीं कैसा मोठा होता ।  
दृष्ट लागली न कळे आतां ।  
तीट म्हणुनि त्या लावी माता ।  
सांग मज आई ।  
चांदोबा बारिक होई ॥ २ ॥

“ नसे रोडका–लहान अजुनी ।  
होइल मोठा मोठा प्रतिदिनिं ”।  
सांगे बाला समजुत करुनी ।  
सांग मज आई ।  
चांदोबा बारिक होई ॥ ३ ॥



*   *   *

—पौर्णिमेस

बघ गे आई ।
चांदोबा मोठा होई ॥
गोरा गोरा पान जहाला ।
बदाम खाउनि दूधहि प्याला ।
गुण ये औषध घेउनि त्याला ।
बघ गे आई ।
चांदोबा मोठा होई ॥ ४ ॥

बघुनि मजकडे कैसा हंसतो ।
ये ये म्हणतो मज खुणवीतो ।
मजसम तोही नभीं चालतो ।
बघ गे आई ।
चांदोबा मोठा होई ॥ ५ ॥

ढगांत लपतो चोरुनि बघतो ।
क्षणांत येतो क्षणांत जातो ।
ये खालीं तुज खाऊ देतों ।
बघ गे आई ।
चांदोबा मोठा होई ॥ ६ ॥

२४-१-३३

# ( ५ ) नव्या बाहुलीचें लग्न

घेतली
नवी बाहुली
शकू धांवली
येत अंगणीं, येत अंगणीं
कां नाहीं आल्या अजुनि सर्व मैत्रीणी ॥ १ ॥

खेळणीं
सर्व घेउनी
वाट पाहुनी
किती गे थकलें, किती ग थकलें
वाजतीं पाउलें खचित कुणी तरि आलें ॥ २ ॥

ही खुशी
सजुनियां कशी
विहिण कीं जशी
शोभते आहे, शोभते आहे
कां निरखुनि माझी नवी बाहुली पाहे ॥ ३ ॥

थाटल्या
सर्व पातल्या
मुद्दें देखिल्या
सर्व मैत्रीणी, सर्व मैत्रीणी
गलबला करीती सर्वजणी येऊनी ॥ ४ ॥

" का शकू
कधीं घेतली
नवी बाहुली
नाहिं दावीली, नाहिं दावीली
बघतसे लाजुनी कशी नोवरी सजली " ॥ ५ ॥

करवल्या
सर्व मिरवल्या
म्हणूं लागल्या
" लावुं या लगिन, लावुं या लगिन
घेउनी कुंकुमाक्षता म्हणति " सावधान " ॥ ६ ।

हासता
लग्न लावितां
खाउ वाटिता
करीती थट्टा, करीती थट्टा
हां चला लवकरी करूं या चट्टा—मट्टा ॥ ७ ॥

१९—७—३२

## ( ६ ) सदू शिवाजी



मी असे शूर सरदार
छोटि तलवार
ऐटींत घेउनी हातिं वीर मी लढाईस जाणार ॥१॥

जमविले मित्र मग छोटे
झोकांत चालती मोठे
जणुं सैन्य निघालें थाटें
शाळेसि होइ जों सुट्टि सदूनें युद्ध सुरूं केलें ॥२॥



हो सदू शिवाजी राजा
तोंडींच वाजवी बाजा
घरभर अति गाजावाजा
धिंगाणा करुनी डोकीवरती घेती घर सारें ॥३॥



गोंगाट ऐकुनी येई
रागांत सदूची आई
सुट्टीच नको ही बाई
घ्या पाटी ना तरि काठि आणुंका
खाउ तुम्हां देणार ॥४॥

तितुक्यांतच बाबा आले
तों वीर पळत ते सुटले
पाठींशीं शिवबा लपले
मातेची करुनी ढाल
सदूनें संरक्षण केलें ॥ ५ ॥

२६-९-३२

करवल्या
सर्व मिरवल्या
म्हणूं लागल्या
" लावुं या लगिन, लावुं या लगिन
घेउनी कुंकुमाक्षता म्हणति " सावधान " ॥ ६ ॥

हासता
लग्न लावितां
खाउ वाटिता
करीती थट्टा, करीती थट्टा
हां चला लवकरी करुं या चट्टा—मट्टा ॥ ७ ॥

१९—७—३३

## ( ६ ) सदू शिवाजी



मी असे शूर सरदार
छोटि तलवार
ऐटींत घेउनी हातिं वीर मी लढाईस जाणार ॥१॥

जमविले मित्र मग छोटे
झोकांत चालती मोठे
जणुं सैन्य निघालें थाटें
शाळेसि होइ जों सुट्टि सदूनें युद्ध सुरूं केलें ॥२॥

हो सदू शिवाजी राजा
तोंडींच वाजवी बाजा
घरभर अति गाजावाजा
धिंगाणा करुनी डोकीवरती घेती घर सारें ॥३॥



गोंगाट ऐकुनी येई
रागांत सदूची आई
सुट्टीच नको ही बाई
ध्या पाटी ना तरि कोठे आणुंका
खाउ तुम्हां देणार ॥४॥



तितुक्यांतच बाबा आले
तों वीर पळत ते सुटले
पाठीशीं शिवबा लपले
मातेची करुनी ढाल
सदूनें संरक्षण केलें ॥ ५ ॥

२६-९-३२

## ( ७ ) लाटांच्या लीला

[ ११-१२-३२ रोजीं सकाळीं आम्ही जुहू येथें गेलों होतों. त्या वेळीं आमच्या बरोबरचीं मुलें समुद्रावर आनंदानें खेळण्यांत मग्न झालीं होतीं, त्यावरून सुचलेले विचार. ]

या लाटांनो या पुढतीं । सागरास बालें वदती ॥
खेळाया आम्ही येतां । परतुनि मागें कां जातां ॥
ऐकुनि बालांच्या बोला । हर्ष सागरा मनिं झाला ॥
हळूहळू तो येइ पुढें । फेन तयाचा उंच उडे ॥
माय घुसळिते ।
दधी गृहीं तें ।
तसें भासतें ।
सागरजल हें खळखळतें । पुढें पुढें ये नच खळतें ॥ १ ॥

ये पुढतीं तूं येइ गड्या । अतां चला जलिं घेउं उड्या ॥
पाय बुडवुनी त्या वेळे । उभीं राहतीं जलिं बाळें ॥
सन्निध येतां परि लाटा । भयें पळति मग चहुंवाटा ॥
खदखद हंसती तीं सगळीं । पिटिती आनंदें टाळी ॥
टाळी ऐकुनि ।
घो घो गर्जुनि ।
पुढें येउनी ।
जल बालांच्या पदिं लोळे । बालासंगें जणुं खेळे ॥ २ ॥

घेउनि वाळू मग हातीं । मोठाले किल्ले रचिती ॥
शंख शिंपले वेंचियले । खिसे भरोनी ठेवियले ॥
विसरुनि अपुल्या भानाला । करिति गोडशा गानाला ॥
द्वेष ठाउका ना चिंता । ये बालांना तल्लिनता ॥
तल्लिनतेला ।
पूरच आला, ।
हर्ष-निर्धाला—।
ये बालांच्या जणुं भरती । तुच्छ स्वर्गसुख यापुढतीं ॥ ३ ॥

देखुनि त्यांचे खेळ असे । सृष्टि-देविला येइ हंसें ॥
जीव-सुमें तीं गोड किती । फुलुनि जगाला फुलवीती ॥
हास्यवदन हो बालें तीं । हंसुनि जगाला हंसवीती ॥
बाह्यांतरही खुलें असे । आनंदचि चहुंकडे दिसे ॥
त्या क्रीडांगणीं ।
कणा-कणानीं ।
नाद घुमोनी ।
उसळुनि गगनीं दुमदुमला । विश्व व्यापुनी वरि उरला ॥ ४ ॥

११-१२-३२

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ६९३७ ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत नं. ४१५ ता. ठाणे

## ( ७ ) लाटांच्या लीला

[ ११–१२–३२ रोजीं सकाळीं आम्ही जुहू येथें गेलों होतों. त्या वेळीं आमच्या बरोबरच्चीं मुलें समुद्रावर आनंदानें खेळण्यांत मग्न झालीं होतीं, त्यावरून सुचलेले विचार. ]

या लाटांनो या पुढतीं। सागरास बालें वदती ॥
खेळाया आम्ही येतां। परतुनि मागें कां जाता ॥
ऐकुनि बालांच्या बोला। हर्ष सागरा मनिं झाला ॥
हळूहळू तो येइ पुढें। फेन तयाचा उंच उडे ॥
माय घुसळिते।
दधी गृहीं तें।
तसें भासतें।
सागरजल हें खळखळतें। पुढें पुढें ये नच खळतें ॥ १ ॥

ये पुढतीं तूं येइ गड्या। अतां चला जलिं घेउं उड्या ॥
पाय बुडवुनी त्या वेळे। उभीं राहतीं जलिं बाळें ॥
सन्निध येतां परि लाटा। भयें पळति मग चहुंवाटा ॥
खदखद हंसती तीं सगळीं। पिटिती आनंदें टाळी ॥
टाळी ऐकुनि।
घो घो गर्जुनि।
पुढें येउनी।
जल बालांच्या पदिं लोळे। बालासंगें जणुं खेळे ॥ २ ॥

## ( ८ ) काय कथुं त्यांसी—

ना वाजे घुंगुरवाळा ।
बाळ तो कुठें मम गेला ।
दचकुनी उठे ।
" असासि तूं कुठें ।
धीर मम सुटे ।
कुठें तरि जाई । कुठें तरि जाई । "
शोधिते म्हणोनी आई । पाडसा ॥ १ ॥

* * *

आवाज गडबडां झाला ।
अगबाई छकुला पडला ।
देखतां खोंक बाळाला ।
आइचा जीव कळवळला ।
अंकावरि घेउनि त्याला ।
कवळुनियां हृदयीं धरिला ।
' घरीं येतील ।
मला पुसतील ।
राग करतील ।
काय कथुं त्यांसी । काय कथुं त्यांसी ।
धाकें या न सुचे मजसी । क्षणभरी ' ॥ २ ॥

२१–७–३२

## ( ९ ) पूर्व-पश्चिमेचें भांडण

पूर्वः—ऐक पश्चिमे तुला सांगते उगाच वटवट करूं नको ।
प्रभातकालीं मंगल वेळीं चेंडूसाठीं भांडुं नको ॥ १ ॥
विश्वारंभापासुनि माझ्या–जवळीं चेंडू असे पहा ।
जन्मसिद्ध मम हक्क असे हा, साहि न चेंडूच्या विरहा ॥ २ ॥
रंग लाल बघ नक्षी भंवतीं देखतांच मन मोहितसे ।
घेइन तुजला खेळायाला परि माझा गे हक्क असे ॥ ३ ॥

पश्चिमः—चल जा खोटी चावट मोठी हक्क सांगसी यावेळीं ।
खेळुनि दमतां संध्याकाळीं फेंकुनि देशी मजजवळी ॥ ४ ॥
करीं घेउनी, चोरापासुनि जपते रात्रीं मी यासी ।
तेव्हां कोठें जाशी पूर्वे ? अतां सांगसी हक्कासी ॥ ५ ॥


उत्तर व दक्षिणः—पुरे पुरे गे भांडण आतां मिळोनि एकी सर्व करूं ।
आपण चौघी बहिणी सख्या लाल चेंडु हा करीं धरूं ॥६॥
जतन करूं या आपण याचें सकलांचा सम हक्क असे ।
टाकूं आतां एकीमेकीकडे, कसा हा खुलुनि दिसे ॥ ७ ॥

२४–४–३२

## (१०) घूम् पारव्या घूम्

घूम पारव्या
गोष्टि कासया

गुलगुल करिशी ?
क्षणांत उडशी—



घुम् घुम् नादा
करुनी शब्दा

खिडकीवरती
मागें पुढती—


घेउनि गिरकी
फिरते फिरकी

तसा भासतो
मधें नाचतो


मान वळवुनी
पंख पसरुनी

फडफड करिशी
रंग दाविशी

कुणा भुलविसी
ठाउक मजसी !—



वृक्षिं पारवी
बसे, थोरवी



दावुनि तिजला
हंसवायाला ?

संसाराची
आस मनींची—

ती पुरवाया
प्रेम कराया

तुला सोबतिण
हवी म्हणून

श्रम हे सारे
करिसि ना रे ?

ठाउक मजसी
तिजला वैरिसि

घुम् घुम् नार्दी
पाडुनि फंदी

तल्लिन होउनि
जाशि रमूनी

घूम् पारव्या घूम्

२२-१२-३२

# ( १४ ) अर्धोन्मीलित गुलाब-कलिका

अर्धोन्मीलित गुलाब-कलिका दोन टपोऱ्या कशा ।
कशाला सांग खुडूं मी अशा ॥
सूर्योदय होउनी अतां गे काल बहुत लोटला ।
पहा हा अस्तसमय पातला ॥
कां न विकसल्या अजुनी कलिका मधुप वाट पाहतो ।
हाय तो विरहिं काल कंठितो ॥
हें कलिकांनो मिटुनि पाकळ्या काय लाभ जोडिता ।
सृष्टिचा नियम कसा मोडिता ॥
फुला फुला गे फुला झडकरी किती विनवुं मी तरी ।
का न ये दया तुम्हां अंतरीं ॥
असें वदोनी तरुण एक तो समीप त्या येउनी ।
बघतसे तयांकडे हांसुनी ॥
हळूच मारी टिचकी त्यावरि—उमलति कलिका क्षणीं ।
देखतां तरुण तुष्ट हो मनीं ॥
गुलाब नोहे—गाल गुलाबी तीळ असे त्यावरी ।
भासला भ्रमर गुलाबावरी ॥
स्पर्श—सौख्य होतांच तरुणिच्या प्रेमभाव अंतरीं ।
विकसले गाल गुलाबापरी ॥

१५-१२-३२

## ( १२ ) मारुताच्या चेष्टा

सुम नाजुक तें ।
वेणीवरतें ।
खोंचुनि ललना हिंडतसे ।
सुगंध मार्गीं सुटत असे ॥ १ ॥

हळूच मारुत ।
येउनि चोरित, ।
कुंतल उडवित मुखावरी ।
चेष्टा सतिची काय करी ॥ २ ॥

' लाज सांडिसी ।
परनारीसी ।
सलगी ऐसी कां करिसी ।
सुत–दारा असती तुजसी ॥ ३ ॥

सोडुनि अंजनी ।
संचरसी वनिं ।
जनक म्हणविसी मारुतिचा ।
ब्रह्मचारि, सुत अंजनिचा ' ॥ ४ ॥

२४–११–३२

## ( १३ ) प्रेम

प्रेमा जग वेडें म्हणतें ।
  हृदयासि कसें खुलवीतें ॥
ज्या कंठिं पाश प्रेमाचा ।
  झुलवितो झोल हृदयाचा ॥
अति सूक्ष्म तंतु प्रेमाचे ।
  गुंफिती जाल हृदयींचे ॥
गुंतता प्रेममय गांठी ।
  सोडितां कुणा नच सुटती ॥
कुणि म्हणति 'अंध' कुणि 'खुळें' ।
  परि जगति जीव त्यामुळें ॥
जग तुफान-दर्या हो का ।
  प्रेमानें तरती नौका ॥
व्यापितां तिमिर जगताला ।
  तरि दिव्य-दृष्टि प्रेमाला ॥
रविकिरण तीव्र जरि भासे ।
  प्रेमानें नलिनी हांसे ॥
गर्जतो मेघ नभिं काळा ।
  प्रेमानें चमके चपला ॥
होतांच प्रेममय वृष्टि ।
  खुलतसे अखिल ही सृष्टि ॥
सुखवितें प्रेम सृष्टीला ।
  त्यामुळें स्फूर्ति जगताला ॥
भासतें मुकें परि बोले ।
  प्रेमास्तव जग हें चाले ॥
प्रेमा जग वेडें म्हणतें ।
  खुलुनियां जगा खुलवीतें ॥

२९-५-३३

## ( १४ ) अरसिक

वसंत ऋतु येई ।
मनोहर, वसंत ऋतु येई ।
हो तुष्ट रसिक परि अरसिक वदतो त्यांत कांहिं नाहीं ! ॥
गोड गान गाई ।
कोकिळा गोड गान गाई ।
गुंगतो रसिक परि अरसिक वदतो त्यांत कांहिं नाहीं ॥
फलकुसुम बहर येतसे वृक्षलतिकेसी ।
येतांच समिर हो पुष्पसडा धरणीसी ।
पसरला गंध त्यासवें तोष सकलांसी ।
हर्ष भरुनि राही ।
चहुंकडे, हर्ष भरुनि राही ।
हो स्वर्ग धरा परि अरसिक वदतो त्यांत कांहिं नाहीं ॥ १ ॥
चित्र रम्य पाही ।
सृष्टिचें चित्र रम्य पाही ।
हा विचित्र मतिचा अरसिक वदतो त्यांत कांहिं नाहीं ॥
रसिक दृष्टि नाहीं ।
बापुड्या, रसिक दृष्टि नाहीं ।
जणुं बसे स्मशानीं अरसिक वदतो त्यांत कांहिं नाहीं ॥
जरि रसिक काननीं रुक्ष शिला पाहे तो ।
सौंदर्य रसिकता त्यांतच तो शोधीतो ।
उपनेत्र असति त्या परी वस्तु मानीतो ।
म्हणुनि सौख्य नाहीं ।
अरसिका, म्हणुनि सौख्य नाहीं ।
बुडविला जरी त्या हर्षसागरीं तरी शुष्क राही ॥ २ ॥

१९–१२–३२

## ( १५ ) सहज सार्थता

वसन नूतन कामिनी कोणि ल्याली ॥
मग्न रांगोळी काढण्यांत झाली ॥
बाह्य-रेषा त्या प्रथम रेखियेल्या ॥
वृक्ष—वेली तारका काढियेल्या ॥ १ ॥

चित्रिं काढी ती एक तरुण बाला ॥
जणूं रांगोळी घेत काढण्याला ॥
दोन बालें चिमुकलीं जवळिं काढी ॥
एक मातेचा पदर धरुनि ओढी ॥ २ ॥

दुजें रांगोळी घेउनियां हातें ॥
समिप बैसे जणुं चित्र काढण्यातें ॥
उरप मार्गे त्या पिता दर्शवीला ॥
भाव चित्रीं त्या असा प्रगट केला ॥ ३ ॥

सुधा, लावोनी चित्त, चित्र काढी ॥
वदे दचकोनी ' कोण पदर ओढी ' ॥
तिचें बालक तें ओढि पदर वेगें ॥
उभा होता पति हास्य करित मार्गे ॥ ४ ॥

हळुंच वदली ती हंसुनिया दुजाला ॥
नको रांगोळी सांडु वृथा बाळा ॥
काढि चित्रीं कल्पना—तेंचि झालें ॥
पतिस देखोनी हास्य तिला आलें ॥ ५ ॥

‘ तरुणबाला यांतली तूंचि का गे ॥
दोन बाळें आपुलीं काय सांगे ॥
उभा मार्गे जो–काय असे मी तो ॥ ’
पती वदला ‘ मज भास असा होतो ’ ॥ ६ ॥

चित्र गृहिचें, गृहिणीच चित्रकार ॥
देखतांची त्यां हर्ष होइ फार ॥
‘ काय देऊं बक्षीस सांग याला ’ ॥
—आणि खोंची वेणींत गुलाबाला ॥ ७ ॥

२२–१२–३२

4832



## ( १६ ) निशेचा स्वैराचार

" घेउनी पटल कृष्ण, मुखावरी ।
कां अशी फिरसि तूं वद सुंदरी ।
स्वैरता, कुलिन तूं, नच शोभते ।
भीति ना तुजसि कां मुळिं वाटते ॥ १ ॥

साजिरा बिजलिचा जवळीं नवा ।
घेतला लपुनि चोरदिवा तुवां ।
हार हा टिकलिचा गळिं शोभतो ।
कासया करिशि गे वद थाट तो " ॥ २ ॥

*　　*　　*

" ऐक तूं, मज जनीं म्हणंती निशा ।
मी मुळीं न भटके समयीं अशा ।
मी वरी कुलिन त्या शशिला पती ।
वाट ते उगवुनी मम पाहती ॥ ३ ॥

मी सती पतिस या समयीं अशा ।
जातसे रमविण्या, वदली निशा ।
थाट या समयिं सुंदर शोभतो ।
घातला म्हणुनि मी गळिं हार तो ॥ ४ ॥

मीलनास अमुच्या नभिं देखती ।
भेटती प्रियकरां, जन हर्षती ।
हर्षवी प्रणयि-युग्म जरी असे ।
स्वैर तूं मजसि गे म्हणसी कसें " ॥ ५ ॥

७-१२-३२

# ( १७ ) गिरणी-कामगाराचें स्वप्न

ऐकोनि वीर धाला । युद्धार्थ सिद्ध झाला ॥
रणशिंग काय वाजे । युद्धासि बोलवीजे ॥
रण-साज घालि अंगीं । समशेर घेत नंगी ॥
पाठीस ढाल साजे । रणशिंग काय वाजे ॥
स्फुरती तदीय बाहू । भ्याडासि युद्ध बाऊ ॥
सेनापतीच कीं जे । रणशिंग काय वाजे ॥
देई निरोप भार्या । "यश येउं द्या सुकार्या ॥"
हातांत बाळ दीजे । रणशिंग काय वाजे ॥
डोळयांत अश्रु आले । भिजुनी कपोल गेले ॥
"आर्येस हें न साजे । रणशिंग काय वाजे ॥
वीरास शूर भार्या । बघ देइ धीर कार्या ॥
जगतांत कीर्ति गाजे । रणशिंग काय वाजे" ॥

*   *   *

स्वप्नांत तोंच भ्यालाः । "ये शत्रु मारण्याला ॥
मेलों कुणी न या का । किति मारितो ग हांका" ॥
धांवोनि येइ पत्नीः । "भ्यालात काय स्वप्नीं ॥
वा काय शूर राजे ! । वीरास हेंच साजे ? ॥
हो वेळ नेहमींची । गिरणीस जावयाची ॥
भोंगा तिचाच वाजे । रणशिंग नाहिं ! राजे !" ॥

२–१०–३२

## ( १८ ) खूण

राघु डोलतो ।
गोड बोलतो ।
प्रेमाची खूण कुणा काय दावितो ॥ १ ॥
नलिनि हांसते ।
मान मुरडिते ।
प्रेमाची खूण काय कुणा दाविते ॥ २ ॥
वायु वाहतो ।
गंध पसरितो ।
प्रेमाची खूण काय कुणा दावितो ॥ ३ ॥
चन्द्र उगवुनी ।
किरण फेंकुनी ।
प्रेमाची खूण काय भुलवि दावुनी ॥ ४ ॥
द्वारिं कोण तो ।
टिचकि मारितो ।
प्रेमाची खूण काय मला दावितो ॥ ५ ॥
गोड गावुनी ।
शीळ घालुनी ।
प्रेमाची खूण काय देत पटवुनी ॥ ६ ॥

\+ \+ \+

दोन जीव ते ।
प्रीति जोडिते ।
जोडाया जीव काय खूण लागते ॥ ७ ॥

३१–८–३३

# ( १९ ) चोरटी सहल

शांत दशदिशा, पहा पातली कृष्णवर्ण यामिनी ।
नभीं ये चंद्र सवें रोहिणी ॥
श्रांत जगत हो निद्रावश तें असा समय देखुनी ।
सखीसह करी सहल चोरुनी ॥
अपुली कान्ता घेउनि फिरण्या भय कवणाचें नसे ।
खेळसी लपंडाव कां असे ॥
तव बंधु दिनमणी तापट जात्या असे ।
त्यामुळेंच परि तुज उज्वलता येतसे ।
मग वडिल बंधुचें मन मोडावें कसें ।
भय मनिं वाटे म्हणुनि त्याजला निद्रिस्तचि देखुनी ।
फिरसि कां प्रिया सवें घेउनी ॥ १ ॥
नील धवल नभिं अगणित तारा चमकति टिकल्या जशा ।
भासती बुट्या जरीच्या तशा ॥
शालूचा या घेउनि बुरखा ठुमकत गजगामिनी ।
फिरतसे तयासवें रोहिणी ॥
श्रांत चालतां होय प्रिया तव किरण शीत कोंवळे ।
काय त्वां भवतालीं फेंकिलें ॥
नभ सागरिं सोडी मेघ जणों नाव ती ।
बैसुनी त्यामधें आनंदें क्रीडती ।
हरपलें भान मग प्रेमरसीं गुंगती ।
उषा-वहिनिची चाहुल लागे—उठेल कीं दिनमणी ।
भीतिनें जाति घरालागुनी ॥ २ ॥

१०-८-३३

## ( २० ) जमना कोळीण

[ जमना कोळीण पति परत येण्याची वाट पहात असतां एकाएकीं दर्यावर तुफान होतें व सूर्यांजीची होडी उलटून तो मृतस्थितींत वाहून येतो तें दृश्य पाहून जमनाही समुद्रांत उडी घेते. ]

नौकेमाजी ।
तो सूर्यांजी ।
बसून आजी ।
निघे परतण्या गांवाला । उत्सुक येण्या सदनाला ॥ १ ॥

किल्ल्यावरुनी ।
दूर पाहुनी ।
म्हणते जमनी ।
अजुन कां न ये सूर्यांजी । हवा वादळी हो आजी ॥ २ ॥

ढग ते आले ।
नभ हें काळे–।
कुट्ट जहालें ।
भीषणता ये चहूंकडे । अकस्मात हें केंवि घडे ॥ ३ ॥

बुरुजावरुनी ।
बघे वांकुनी ।
उसळे पाणी ।
वाऱ्यासंगें उंच उडे । सूर्याजी का त्यांत बुडे ॥ ४ ॥

शंकित झाली ।
धांवत आली ।
किल्लयाखालीं ।
काय तरंगत तों आलें । देखुनि काळिज चरचरलें ॥ ५ ॥

कुंतल काळे ।
हलति वादळें ।
जसें लव्हाळें ।
फिरून उसळे वर पाणी । उडी त्यांत घे का जमनी ॥ ६ ॥


२६–७–३२

## ( २१ ) वकध्यान.

सरितेसन्निध मीलित लोचनिं । वकराजा ठाकला ॥
योगी जणूं मला भासला ॥ १ ॥

स्नान करोनी धूत धवलसें । वस्त्र अंगिं वेष्टिलें ॥
पंख ते शुभ्र तसे भासले ॥ २ ॥

पदां बुडवुनी उभा जलीं तो । घोर तपातें करी ॥
मुखानें म्हणतो जणुं हरि-हरी ॥ ३ ॥



ध्यान लागलें भान हरपलें ।
लोभ मोह टाकुनी ॥
उभा बक पंखिं चोंच
खोंचुनी ॥ ४ ॥

जलचर त्याला देखुनि वदती ।
घेउं चला दर्शना ॥
करूं या पुण्य मोक्षसाधना ॥५॥

सन्निध येतां मत्स्य आयते ।
ठेवी उदरांतरीं ॥
दावि त्या वाट स्वर्गिची बरी ॥६॥

जसें भासतें तसें न असतें ।
भिन्न भाव अंतरीं—॥
ठेवुनी बकासम, फिरती जन भूवरी ॥ ७ ॥

१-१२-३२

## ( २२ ) चाल तूं जपून

चाल गे चाल तूं जपून
बैसेल पंकिं पद रुतून् ।
जरि मार्ग सरल भासला,
अस्वच्छ पंकिं माखला ।
पंकांत कीटकें खालीं
अगणित लपुनी बसलीं ।
भवतालिं पसरलीं डबकीं
कांटेरी झाडें कुजकीं ।
शैवलें शिला माखल्या
हरितशा शालि भासल्या ।
जरि देशी वरि पाऊल
घसरुनी आंत पडशील ।
चालतां नको बघुं वरती
बोंचतील कांटे भंवतीं ।
एकला पदीं जरि टोंचे
तो सर्व आयुभर जाचे ।
झुडुपांचा आश्रय घेती
फूत्कार सर्प टाकीती ।
वरि पडेल पाउल चुकुन
दंशण्या बैसले टपुन ।
चाल गे चाल तूं जपून्
बैसेल पंकिं पद रुतून् ।

सप्टेंबर, १९३२

## ( २३ ) संसाराचा उदयास्त

आम्रवृक्ष वरि वेल जाइची नाजुकशी सान ॥
लतावृक्षही वनिचे म्हणती जोडी ही छान ॥ १ ॥

आम्रवृक्ष पति योग्य मिळाला भाग्य तिला वाटे ॥
आनंदानें संसाराचे बेत करिति मोठे ॥ २ ॥

वसंतसमयीं जधीं पाहुणा कोकिळ येइ घरीं ॥
तेव्हां देऊं फुलें फळें त्या अपुलीं गोड करीं ॥ ३ ॥

*　　　*　　　*

सोसाट्याचा सुटला वारा, वृक्षहि डळमळले ॥
भिईल नाजुक वेल म्हणुनि जणुं घट्ट तिला धरिलें ॥ ४ ॥

वाऱ्यासंगें धूळ उडे मग नभ झांकुनि जाई ॥
वीज कडाडे भिउनी गेली ही नाजुक जाई ॥ ५ ॥

रक्षण करण्या नूतन वधुचें वृक्ष लढे परि हा ॥
वादळास दे तोंड दाखवी शौर्य कसें पाहा ॥ ६ ॥

वादळ मोठें होतां छोटे वृक्ष वनीं पडले ॥
लढतांनाहि वृक्षराजियें वेलीला धरिलें ॥ ७ ॥

लढतां शौर्यें वाऱ्यासंगें वृक्ष जरी थकला ॥
धैर्यगलित नच होइ, न सोडी अपुल्या भार्येला ॥ ८ ॥

काळासंगें झगडत निकरें शेवटिं तो पडला ॥
पडला जरि ती वेल न सोडी त्याच्या बाहूला ॥ ९ ॥

हा हा दैवा घातचि झाला पति माझा गेला ॥
गोड सुखाच्या संसाराचा नाश तुवां केला ॥ १० ॥

१८–७–३२

## ( २४ ) प्रेम-वंचना

प्रथम कासया प्रेम दाविलें । सांग मला सुंदरी ।
अतां कां लोटिसि मज गे दुरी ॥
प्रीतिचे जहरि कां पराग तूं फेंकिले ।
कवचास हृदयिंच्या व्यर्थ तुवां भंगिलें ।
हृद्भूमि उकरुनी काय सांग शोधिलें ।
बीज प्रीतिचें रोवुनि हृदयीं जाळिसि कां सुंदरी ।
अतां कां लोटिसि मज गे दुरी ॥ १ ॥

ठाव हृदयिंचा सोधण्यास कां प्रेमबाण सोडिला ।
पुरेसा खोल नाहिं वाटला ॥
तव प्रेमशरें ही जखम हृदयिं जाहली ।
ठेविली गुप्त ती नाहिं कुणा दाविली ।
वेदना तियेची शांत मनें साहिली ।
काल लोटतां हळू जखम जरि । वरवर होई बरी ।
बोंचतें अजुनि शल्य अंतरीं ॥ २ ॥

२५-४-३१

## ( २५ ) नलिनीस इशारा

होई प्रभात, विकसे नलिनी जलांत ॥
देखोनि तोष भरला अलिच्या मनांत ॥
घाली कळे न घिरट्या भंवतीं कशाला ॥
गूं-गूं करी सकळ तो मधु चाखण्याला ॥ १ ॥

\+ + +

येईल जैं निकटिं हा मधु चोरण्याला ॥
घे पाकळ्या मिटवुनी पकडी तयाला ॥
देशील जोंवरि गडे मधुराशि यासी ॥
दावील प्रेम तुज तोंवरि बापुडीसी ॥ २ ॥
गानास या जहरि बाइ भुलूं नकोस ॥
वेळींच सावध असो, फसवील खास ॥
संपेल गे सुमधु, जाय उडोनि, जेव्हां ॥
होईल दुःख विरहें तुज हाय ! तेव्हां ॥ ३ ॥

१५-११-३२


# ( २६ ) मुखींचा घास



उशिर हो तरि गृहिं न येत आई ।
बसुनि कोटरिं पाखरूं वाट पाही ॥
उडावें तरि पंख सान हो ते ।
हाय ! बालक चिमकुलें अधिर होतें ॥ १ ॥

माय देखाया उंच करी मान ।
हळुच पाहे चहुंकडे बाळ सान ॥
कधीं देइल येउनी मुखीं घास ।
क्षुधित बाळाच्या हीच मनीं आस ॥ २ ॥
वायु लहरींनीं पर्ण–नाद होई ।
बघे दचकोनी भयाभीत होई ॥
करुनि चिंवचिंव तों शब्द येत आई ।
पंख पसरोनी बाळ जवळिं घेई ॥ ३ ॥

घास देण्यासी क्षुधित बालकाला ।
घालि चंचू चंचूंत—काळ आला ॥
हाय ! मरणाचा बाण कोण सोडी ।
हृदय भेदी मातेस खालिं पाडी ॥ ४ ॥
घास मुखिंचा राहिला मुखामाजीं ।
सोडि बाळा एकलें जगामाजीं ॥
जाइ सोडोनी क्षुधित अर्भकाला ।
हाय काळानें घात कसा केला ॥ ५ ।



१७–१२–३२

## ( २७ ) मातृप्रेम

किति गोड प्रेम मातेचें ।
वर्णना करूं मी त्याचें । किति तरी ॥
कथुं म्हणतां त्याची महती ।
अपुरे ते शब्दहि पडती । वर्णना॥
जरि प्रीति भिन्न रूपाची ।
त्या सर न मातृप्रेमाची ॥ तिळभरी ॥
निःस्वार्थ प्रेम मातेचें ।
गातात गोडवे त्याचे । म्हणुनियां ॥
जरि असे ।
लुले पांगळे ।
बाळ तें खुळें ।
नावडे जगता । नावडे जगता ।
प्रेमानें चुंबी माता । त्याजला ॥ १ ॥
तोंडीचा ठेवी घास ।
बाळाचा तिजला ध्यास । निशिदिनीं ॥
चुकतांना रागें भरते ।
क्षण जातां, विसरुनि घेते ॥ जवळिं ती ॥
हें प्रेम कुणी वर्णावें ॥
होतांच आइ तिज ठावें । मात्र तें ॥
बोंचतांच कंटक पायीं ।
शब्द मुखीं येती ‘ आई । आइ ग ’ ॥
जरि असे ।
प्रेममय दृष्टि ।
खुले ती सृष्टि ।
मातृप्रेमानें । मातृप्रेमानें ।
भाग्यवान म्हणती ज्यानें । भोगिलें ॥ २ ॥

२२-११-३२

## ( २८ ) आकाश-दिवा.

भूलोकींचा दीपक होशी ।
आकाशीं रे, जाऊं बघशी ॥
मग कां वृक्षीं लटकत बसशी ।
करिसी काय तपा ॥ १ ॥

शुक्र-चांदणी सम लुकलुकशी ।
सांग कुणाला मार्ग दाविशी ॥
कां कवणाची वाट पाहसी ।
जागृत राहोनी ॥ २ ॥

चन्द्र तारका नभीं झळकती ।
निशा काजळी पसरे भंवतीं ॥
शांत दशदिशा; वृक्षावरती ।
एकलाचि दिसशी ॥ ३ ॥

समीर ये परि भय ना वाटे ।
हिंदोळ्यासम डोलशि थाटें ॥
वृक्षीं फळ जणु झुलतें वाटे ।
तुजला देखोनी ॥ ४ ॥

गुप्त हेर तूं सांग कुणाचा ? ।
स्वर्गीचा का भूलोकींचा ॥
जागृत राहुनि बघसि जगाचा ।
अखिलहि व्यापार ॥ ५ ॥

## ( २९ ) डोळस आंधळी

सुशीलेच्या गृहिं अस्तसमयिं आलें ।
मौज सौधावरि पहाण्यासि गेलें ॥
गृहामागें त्या नदी रम्य वाहे ।
निसर्गाचें माहेर जणूं आहे ॥ १ ॥

मंदवातें जलिं अमित लहरि येती ।
तोय बिंदू भासती मौक्तिकें तीं ॥
विहग जाती गृहिं किलबिलाट होई ।
जणूं म्हणती ‘ भास्करा उद्यां येई’ ॥ २ ॥

सूर्य लेवोनी लाल शाल छान ।
कांठ सोनेरी दावि, हरे भान ॥
रंगभूमीवरि जेविं विविध रंग ।
नभीं देखोनी वृत्ति होइ दंग ॥ ३ ॥

घरीं येतां तें चित्र काढियेलें ।
विविध रंगांनीं विभूषित केलें ॥
दावि सुशिलेतें, फार मनीं आलें ।
“ दृश्य कुठलें ? वद, मोल काय ? ” बोले ॥ ४ ॥

गडे सौधावरि जाउनियां पाहे ।
दृश्य असलें प्रत्यक्ष तिथें आहे ॥
चित्र केवळ हें, यांत काय गोडी ।
सजिव सोडुनि निर्जीव कोण जोडी ? ॥ ५ ॥

मनीं आलें मम काय ही विचित्र ।
निसर्गाचें बिनमोल रम्य चित्र ॥
असें जवळीं, परि देखियलें नाहीं ।
चित्र त्याचें घेउनी मोल देई ॥ ६ ॥

२७-९-३२

दिनभरिच्या भूवरिच्या वार्ता ।
जाशि सांगण्या स्वर्गावरता ।।
प्रभात कालीं येशि खालता ।
मिटुनी नयनाला ।। ६ ।।

उच्च स्थल हें लाभे तुजला ।
म्हणुनि मनीं कां गर्व जहाला ।।
ऐकशील जरि मम वचनाला ।
जाइल उतरोनी ।। ७ ।।

देह दीप त्या आत्मा ज्योति ।
विझतां जाते स्वर्गावरती ।।
विझतां परि तव सुरम्य ज्योती ।
येशी भूवरती ।। ८ ।।

७–३–३३

## ( २९ ) डोळस आंधळी

सुशीलेच्या गृहिं अस्तसमयिं आलें ।
मौज सौधावरि पहाण्यासि गेलें ॥
गृहामार्गे त्या नदी रम्य वाहे ।
निसर्गाचें माहेर जणूं आहे ॥ १ ॥

मंदवातें जलिं अमित लहरि येती ।
तोय बिंदू भासती मौक्तिकें तीं ॥
विहग जाती गृहिं किलबिलाट होई ।
जणूं म्हणती ' भास्करा उद्यां येई' ॥ २ ॥

सूर्य लेवोनी लाल शाल छान ।
कांठ सोनेरी दावि, हरे भान ॥
रंगभूमीवरि जेविं विविध रंग ।
नभीं देखोनी वृत्ति होइ दंग ॥ ३ ॥

घरीं येतां तें चित्र काढियेलें ।
विविध रंगांनीं विभूषीत केलें ॥
दावि सुशिलेतें, फार मनीं आलें ।
" दृश्य कुठलें ? वद, मोल काय ? " बोले ॥ ४ ॥

गडे सौधावरि जाउनियां पाहे ।
दृश्य असलें प्रत्यक्ष तिथें आहे ॥
चित्र केवळ हें, यांत काय गोडी ।
सजिव सोडुनि निर्जीव कोण जोडी ? ॥ ५ ॥

मनीं आलें मम काय ही विचित्र ।
निसर्गाचें विनमोल रम्य चित्र ॥
असें जवळीं, परि देखियलें नाहीं ।
चित्र त्याचें घेउनी मोल देई ॥ ६ ॥

२७-९-३२

## ( ३० ) दीप-गृह

उंच उंच खडकावरती ।
खांब पाहिला उंच अती ॥
भिडे जाउनी गगनासी ।
हितगुज करण्या कीं त्यासीं ॥
लहान मोठे खडक किती ।
तुझ्या पसरले सभोंवतीं ॥
तिथें सोबती ना कोणी ।
भिडती लाटा येऊनी ॥
जरी एकला
उभा राहिला
कर्तव्याला
मुळिं न विसरला कधीं पहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ १ ॥

जइं सूर्याचें साम्राज्य ।
उदासवाणें तव राज्य ॥
किती तीव्र हे रवि-किरण ।
पसरति तव शिखरीं जाण ॥
अफाट सागर तुझ्यापुढें ।
भरती येतां उंच उडे ॥
ध्यान लाउनी कीं योगी ।
तसा बैससी या जागीं ॥
खराच ज्ञानी
ठेवुनि ध्यानीं
दिवस-यामिनीं
मार्ग दाविसी सदा पहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ २ ॥

अंधार पडे घनदाट ।
काय पुसावा तव थाट ॥
शिखरीं छत आकाश दिसे ।
चंद्र तारका-सर्वे हंसे ॥
सरल नासिकीं जशि मुरणी ।
दीप दिसे हा तव दुरुनी ॥
ना पोकळ रे तव थाट ।
वादाळीं दाविशि तूं वाट ॥
संकटिं प्राणी
तुला देखुनी
तुष्ट होउनी
धन्यवाद तुज देति अहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ ३ ॥

उभा राहुनी तूं त्यांना ।
देशी धोक्याची सुचना ॥
जरी याल हो तुम्हि इकडे ।
खडक काळ हा तुम्हांपुढें ॥
जरि तुम्हांला तो न दिसे ।
पाण्याखालीं लपुनि बसे ॥
किती वांचविसि तूं जीव ।
त्यांस वाटसी तूं देव ॥
चैन टाकुनी
स्थिर राहोनी
कष्ट सोसुनी
मदत करीसी किती अहा । धन्य धन्य तव दीपगृहा ॥ ४ ॥

२५–७–३२

## ( ३१ ) सृष्टिदेवींचें स्नान

तीव्र आतपें घर्म येतसे कोमल देहाला ।
सृष्टिदेवते झडकरि चल गे मंगल स्नानाला ॥ १ ॥

स्नानाचें जल तप्त रवी करि,—शीत पहा झालें ।
कुंभ भरोनी स्नान घालण्या जलद नभीं आले ॥ २ ॥

सुगंध तैलें तुला माखण्या चपला झणिं येई ।
मेघ वाजवी मंगल वाद्यें कडकडाट होई ॥ ३ ॥

दिशापटल मग वेष्टुनि बैसे मंगल स्नानाला ।
जलवृष्टी हो तिजवर म्हणुनी ये उत्साह तिला ॥ ४ ॥

वर्षाकालीं सृष्टिदेवता स्नान करी थाटें ।
मंगल विधि देखतां पातली दीपावलि वाटे ॥ ५ ॥

प्रसन्न वदनें मूर्ति तियेची सुंदरता ल्याली ।
धुवोनि गेलें मालिन्य तिचें विमल तनू झाली ॥ ६ ॥

अंग पुसाया किरणपटल जणुं रवि तिजला देई ।
कुंकुम तिलका भालिं रेखण्या उषादेवि येई ॥ ७ ॥

वनिंच्या देवी हरितवसन तिज नेसाया देती ।
निसर्ग बंधू नवकुसुमाच्या माला अर्पीती ॥ ८ ॥

सागर-सरिता हर्षें तिजला सामोऱ्या जाती ।
तरु-शाखेवरि बैसुनि गानें खग तिज रमवीती ॥ ९ ॥

नभिंच्या तबकीं रवी निरंजन घेउनियां हातीं ।
करी आरती मंगल चिंती पूर्वादिशा पुढतीं ॥ १० ॥

१७-७-१९३३

## ( ३२ ) विश्वाचा पाळणा.

न कळे मज तो कोण असे । विश्व-पाळणा झुलवितसे ॥
लटके वरि परि दोरि नसे । तरी कसा हा डोलतसे ॥
पवन देतसे या झोका ? । जो जो म्हणुनी निजवी का ॥
जागृत करण्या भानु निघे ? । उठे विश्व मग त्यासि बघे ॥
घेउनि हातीं । तबक आरती ।
उजळुनि ज्योती । क्षितिजावरती ।
सुवासिनी ह्या काय दिशा । करूं आरती वदति अशा ॥१॥

देतां झोका दमलेलें । तुष्ट होउनी विश्व खुलें ॥
उंच उंच जरि घे झोका । तुटे न केव्हां भिऊं नका ॥
अंत निजविलें गुणि बाळा । जो जो जो बा वेल्हाळा ॥
गीत गातसे हें कोण । काय सुखाची मग वाण ॥
सहजोद्भव तें । प्रेमचि गातें ।
झोका देतें । विश्व हालतें ।
प्रेमाची त्या जोड मिळे । म्हणुनी सारें विश्व डुले ॥ २ ॥

२१-१२-३२

## ( ३३ ) कल्पनातीत भाग्य

हा ! व्यर्थ शिला मी बनलें ।
एकली वनीं या पडलें । बापुडी ।
उदयास भाग्य कधिं येई ।
बसुनियां वाट मी पाहीं । या वनीं ।
बहुकाल लोटुनी गेला ।
उद्धरी न कोणी मजला । अजुनियां ।
येउनी ।
राम या वनीं ।
पदां लावुनी ।
उद्धरी वनिता । उद्धरी वनिता ।
गौतमें शापिता कान्ता । या स्थलीं ।। १ ।।
मनिं खिन्न शिला ती झाली ।
दुःखीत होउनी वदली । हे प्रभो ।
येशील काय तूं येथें ।
नेशील उद्धरुनि मातें । आस ही ।
वदतांच अशा बोलाला ।
शिल्पकार तेथें आला । अवचित ।
देखुनी ।
शिला घेउनी ।
गृहा नेउनी ।
मूर्ति घडवीली । मूर्ति घडवीली ।
प्रत्यक्ष राम ती झाली । नवल हें ।। २ ।।
सामर्थ्य येतसे मग त्या । दुसऱ्यासी उद्धाराया ।। भाग्य हें ।।

१७-१२-३२

## ( ३४ ) शकुन्त आणि शकुंतला

प्रभातकालीं शकुंतलेच्या अंगणिं शकुन्त येती ।
लावाया त्यां हांकुनि, बाला वाजवि टाळी हातीं ॥
वाटुनि भय उडती । अपुल्या घरट्या मग जाती ॥ १ ॥

मातापितरां स्फुंदुनि म्हणती " शकुंतला आम्हाला ।
टाळी वाजवि भय दावाया उडवी कीं सकलांला ॥
भगिनी ती अमुची । निष्ठुर झाली कैची " ॥ २ ॥

वयें वृद्धसा शकुन्तपक्षी त्यामाजीं जो होता ।
ऐकतांच वच येउनि बैसे जवळीं वृक्षावरता ॥
पुसण्या बालेतें । भय कां दावियलें त्यांतें ॥ ३ ॥

पिटुनि टाळी कां भिववितेस त्यांना ।
उडविलेंसी गे काय विहंगाना ॥
भगिनी-प्रेमास्तव तुझ्या गृहा येती ।
भगिनी–प्रेमाची हीच काय रीती ॥ ४ ॥

जन्म देतांची माय तुला टाकी ।
वृक्षछायेला जैं नदी-तटाकीं ॥
वनीं नव्हतें रक्षण्या तुला कोणी ।
रुदन करिसी बापुडी दीनवाणी ॥ ५ ॥

हृदय द्रवलें झणिं उडुनि अम्ही गेलों ।
चंचुमाजी जल घेउनियां आलों ॥
तुला पाजियलें रक्षण्यासि काया ।
पंख पसरोनी धरिलि वरी छाया ॥ ६ ॥

वनीं पडशी एकली दीनवाणी ।
तदा रक्षियलें याच शकुंतांनीं ॥
म्हणुनि बाळे तव 'शकुन्त-ला' ऐसें ।
नाम ठेविति मुनिवर्य जाण खासें ॥ ७ ॥

बंधुभगिनीचें यांसि तुझें नातें ।
प्रेम वाढवि गे विसरुं नको यांतें ॥
जरी होशी तूं मानवंत थोर ।
जयें वाढविलें त्यां काय विसरणार ? ॥ ८ ॥

मनीं उमगे, मग हंसुनि तया बोले ।
काय परके मम बंधु मला झाले ? ॥
तया पाहोनी हर्ष मला झाला ।
पिटुनि टाळी मी व्यक्त तोचि केला ॥ ९ ॥

धाव घेवोनी गृहामधें गेली ।
मुष्टिमाजीं घेउनी धान्य आली ॥
'भाउ-दादा या रुसूं नका आतां ।
गृहा माझ्या ही भाउबीज होतां' ॥ १० ॥

शकुंतलेची प्रेमळ वाणी ॥
ऐकुनि येती शकुन्त अंगाणिं ॥
पटापटा मग धान्य टिपोनी ॥
हर्षित गृहिं जाती ॥ ११ ॥

२१-६-३३



# ( ३५ ) रवि व रवी

आकाशाची करुनी चरवी ।
त्यांत फिरतसे गरगर तो रवि ।
त्याची माझ्या पुढति थोरवी ।
खचित नसे बाई ॥ १ ॥
विश्वपाळ रवि वरी नाचवी, ।
दधिसम धवला ढगां घुसळवी ।
भूलोकींची स्त्री मी हो रवी ।
प्रबलचि त्याहूनी ॥ २ ॥
गृहिणी धरुनी मजला हस्तीं ।
कटिला माझ्या रज्जु बांधिती ।
कंकण-नाद मनोहर उठती ।
घुसळिति त्या जेव्हां ॥ ३ ॥
घुमघुम ऐसा नाद ऐकुनी ।
बालचमू ये धाव घेउनी ।
नाचत लोणी हातिं धरोनी ।
भक्षिति प्रेमानें ॥ ४ ॥
नभीं नाचवी कृष्ण रवीला ।
त्याच नाचवी मी कृष्णाला ।
' दे आई मज नवनीताला ' ।
पदर धरुनि झोंबे ॥ ५ ॥
रवी नाचवी जी भगवंता ।
तिजपुढती हो काय रवि-कथा ।
थोर कोण तें सांगा आतां ।
ख—रवि का भू—रवी ॥ ६ ॥

—१२-३२

# ( ३६ ) कालचक्र

हें साधें मंजुळ गान
हरतसे भान ।
एकांत स्थलीं या न कळे मजला गात असे कोण ॥
नारळी कर्दळी दाट
वेलींचा भवतीं थाट
त्यांमधुनि वाहती पाट
झुळुझुळूं वाहते जल त्यांमधुनी फिरे जई मोट ॥ १ ॥
माळी तो फिरवी मोट
गरगरा फिरे राहाट
पाण्याचा वाहे पाट
अन् गान-समुद्रा ये माळयाच्या भरतींचा लोट ॥ २ ॥
चक्रासम घट हे फिरती
भरती ते रिक्तच होती
रिक्त ते भरुनि वर येती
परि गानलुब्ध तो चालक माळी न करी पर्वा ती ॥ ३ ॥
बा कालचक्र हें फिरतें
धनिकास अधनता येते
दीनास भाग्यही मिळतें
सुख कोण दुःख वा कोण करितसे काल न पाही तें ॥ ४ ॥
परमेश धनी विश्वाचा
हो माळी त्या मोटेचा
चालला ओघ कालाचा
हो क्षणिक आयु हें म्हणुनि करूंया घोषच गानाचा ॥ ५ ॥

९-१०-३२

## ( ३७ ) उन्मत्त सरिता

( इंग्रजी कल्पनेवरून )

वर्षा-कालीं ।
जलवृष्टि भूवरी झाली ॥ धृ० ॥
सरिता तुडुंब सलिलें भरली ।
घो घो गर्जत पुढें चालली ।
पाडी तटिंच्या ही तरु-वेली ।
वैभव-कालीं ।
उन्मत्तचि सरिता बनली ॥ १ ॥
जल बहु मिळतां मस्त जहाली ।
वैभव-पटलें अंधच बनली ।
तुच्छ मानुनी सकलां हंसली ।
वैभव-कालीं ।
उन्मत्तचि सरिता बनली ॥ २ ॥

× × ×

वसंत ऋतु ये नियामित कालीं ।
निसर्गतेची बागच फुलली ।
तुष्ट होउनी जनता डुलली ।
ऐशा-कालीं ।
गत-वैभव सरिता बनली ॥ ३ ॥
नभीं प्रखर हो अंशूमाली ।
हळुहळु सरिता शुष्क जाहली ।
पाहि न कोणी तिज त्या वेळीं ।
संकट-कालीं ।
बापुडी दीन ती झाली ॥ ४ ॥

१७—२—३३

## ( ३८ ) हा कुणीं धर्म शिकवीला

घेउनी पुजापात्रासी । तुळशीला पूजायासी ॥
नेसुनी धुवटशा वसना । घाइनें येतसे ललना ॥
घालुनी जरीची चोळी । सौभाग्य तिलक हो भाळीं ॥
साहित्य सर्व घेतियलें । वेणीवर सुम खोंवीलें ॥
हातांत कलश घेवोनी । येतसे पदर बांधोनी ॥
भर दुपारची ती वेळ ।
रडतसे भुकेनें बाळ ।
विसरुनी काळ वा वेळ ।
बिलगला घट्ट मातेला । " चल वाढी जेवायाला " ॥ १ ॥

" कारट्या काय केलेंसी । ओंवळा मला शिवलासी ॥
ये इकडे धरितें कान । राहील आठवण छान " ॥
ओढुनी सान हस्ताला । रागानें खेंची बाळा ॥
धरुनियां घट्ट मग झबलें । पाठींत धपाटे दिधले ॥
अडथळा पुजेला येतां । रागानें वदली माता ॥
" या पोरांच्या गे पायीं ।
ना देव धर्म ना कांहीं ।
पूजेला फुरसद नाहीं ।
' खाण्याला दे ग आई ' । नेहमींच रड ही बाई ॥ २ ॥

आतांच चहाच्या वेळीं । खाण्यास दिली ना पोळी ॥
जन्मला जसा दुष्काळीं । ना अन्न दिसे कधिं काळीं ॥
ना वैश्वदेव नैवेद्य । परि यासि पाहिजे खाद्य ॥
लाडका करुनि ठेवियला । डोकीवर चढुनी बसला ॥
जा, घास नाक देवाशीं । ठेवीन पहा उपवासी " ॥

संतप्त माय देखोनी ।
रडतसे स्फुंद-स्फुंदोनी ।
नयनांतुनि वाहे पाणी ।
" ऊं पहा पहा ग आजी । मारी मज आई माझी " ॥ ३ ॥

आजी ती देवघरांत । बैसली माळ ओढीत ॥
बाहेर रडें ऐकोनी । पडतसे माळही गळुनी ॥
जरि वांके वार्धक्यानें । ऐकिलें तीक्ष्ण कानानें ॥
" काय ग काय हें झालें । कृष्णासि कुणीं रडविलें ॥
तुज शिवला म्हणुनी त्याला । करिसि या कडक शिक्षेला ॥
वय वर्षे चारच अजुन ।
सुनबाइ बाळ हा सान ।
लागली भूक त्या म्हणुन ।
बिलगला तुझ्या ओंच्याला । मारिसी उगीच कां त्याला " ॥४॥

रागानें पुसते तिजला । " हा कुणीं धर्म शिकवीला ॥
ठेवुनी उपाशीं बाळ । भर दोन प्रहरची वेळ ॥
तडफडे जीव अज्ञानी । तुळशीस कशाला पाणी ॥
जरी सुखी असे जीवात्मा । संतुष्ट होइ परमात्मा ॥
ईश्वरी अंश हा जीव । नेहमीं चित्तिं हें ठेव ॥
प्रत्यक्ष कृष्ण हा येथें ।
परि शोधिसि येथें तेथें ।
कुणि हंसोत शास्त्री मोठे ।
परि असला कसला धर्म । जरि कळे न त्याचें मर्म ॥ ५ ॥

१७-७-३२

## ( ३९ ) भरारी मारणाऱ्या पांखरास

घेशि भरारी । कां नसे लक्ष संसारीं ॥ ध्रु० ॥

काय उणें तुज भासे येथें ।
म्हणुनि शोधण्या जासी तेथें ।
कीं भोगाया स्वर्ग–सुखातें ।
घेशि भरारी० ॥ १ ॥

दा. क्र. ४८३२

लपंडाव वा नभिं खेळावे ।
म्हणुनी जाशी, कुणास ठावें ।
आम्हीं येथें काय करावें ।
घेशि भरारी० ॥ २ ॥

तुफान दर्या खालीं उसळे ।
मेघ नभांतरिं फिरती काळे ।
सोसाट्याचे वारे आले ।
घेशि भरारी० ॥ ३ ॥

परि भय कैचें तुज ना वाटे ।
विमान जणुं नभिं डुलतें वाटे ।
सांग झडकरी जाशी कोठें ।
घेशि भरारी० ॥ ४ ॥

तल्लिन होशी जग नाठविसी ।
तिथेंच का रे तूं रमलासी ।
संसारासी काय विसरसी ।
घेशि भरारी० ॥ ५ ॥

पुरे भराऱ्या खालीं येरे ।
वाट पाहतें बाळ गोजिरें ।
मायपाश तुज नाहीं का रे ।
घेशि भरारी० ॥ ६ ॥

३–६–३३

## ( ४० ) स्वर्गावर स्वारी

घ्या घ्या हातीं बरच्या भाले । स्वर्गावरती चला चला रे ।।
युद्धाची करुं प्रथम तयारी । स्वर्गावरती करुंया स्वारी ।।
स्वर्ग–गडाच्या अवघड वाटा । करुं शस्त्रांचा मोठा सांठा ।।
सेनानायक मेघराज तो । गडगड गर्जुनि तोफ उडवितो ।।
इंद्रधनुष्या घेउनि हातीं । इंद्र सज्ज हो स्वर्गावरती ।।
चमचम चमके नभांत चपला । अंध कराया कीं अपणांला ।।
पर्जन्याचें अस्त्र फेंकिती । पामर समजुनि भीति दाविती ।।
चला वीर हो स्वर्गी जाऊं । स्वर्गराज्य क्षणिं जिंकुनि घेऊं ।।
फोडुं चला भांडार स्वर्गिचें । अलोट धन लुटुं स्वर्गसुखाचें ।।
चंद्र–तारका थोर संपदा । मिळवुनि टाळूं घोर आपदा ।।
क्षुद्र आपुलीं शस्त्रें दिसतीं । विजयी होतां कळेल महती ।।

\+ + +

शस्त्रें अमुचीं हरिनामाचीं । वाट फोडतिल तीं स्वर्गाची ।।
रामनाम हे सुतीक्ष्ण भाले । घ्या घ्या झडकरि चला चला रे ।।
सत्कृत्यांच्या ढालीं हातीं । देखुनि, शत्रू पळतचि सुटती ।।
अहंकार मदलोभ मत्सरा । टाकुनि खालीं अखिल पसारा ।।
परोपकारासम तलवारी । घेउनि करुं या वरती स्वारी ।।
हरिनामाच्या घेतां छंदा । गगन गवसणी तोडिल वंदा ।।
हरिस्तवुनी करुं या गिल्ला । चढवुनि हल्ला घेऊं किल्ला ।।
हंसोत अपणां समजुनि वेडे । पळेरु उघडुनि शत्रु कवाडें ।।
चला जाहली सर्व तयारी । स्वर्गावरही पहिली स्वारी ।।
रणक्षेत्रिं जरि देह टाकिला । स्वर्ग मिळतसे त्या वीराला ।।
विजयी होतां होइल ख्याती । हरिनामाची कळेल महती ।।
भक्तिभाव घ्या निशाण हातीं । भक्कम रोवूं स्वर्गावरती ।।

३–१२–३२

# ( ४१ ) पिकलें पान

बाळे ! तूं आज लहान । मी झालों पिकलें पान ॥
या जगीं कांहिंना अमुचें । दिनिं एक गळुनि जायाचें ॥
आजोबा ऐसें वदलें । शब्दार्थ मजसि ना कळले ॥
आप्तेष्ट सोडुनी सगळे । दिनिं एक निघोनी गेले ॥
न कळे मज कोठें जाती । देवा-घरिं गेले म्हणती ॥

* * *

दिन त्याला बहु नच झाले । अंगणीं सहज मी आलें ॥
बकुलीच्या वृक्षाखालीं । अति सान वेल मज दिसली ॥
कालचा कोंवळा पाला । हळु आज जून तो झाला ॥
फल पुष्पें त्या मग आलीं । नव वधू जेविं कीं नटली ॥
ऐश्वर्य वेलिचें मोठें । कौतूक देखतां वाटे ॥

जीं खुललीं ऐश्वर्यानें । तीं अखेर पिकलीं पानें ॥
गिरक्या तीं गरगर घेती । खालतीं गळूनी पडती ॥
पाहतां पतन पर्णांचें । आजोबा वदले त्याचें ॥
त्या क्षणीं स्मरण मज झालें । गूढ त्यां आज उकलीलें ॥

कोंवळें जून व्हायाचें । जून तें पिकुनि जायाचें ॥
पिकतांच जीर्ण होणार । जीर्ण तें गळुनि जाणार ॥
हा सृष्टिनियम जाणावा । खेद ना कुणी मानावा ॥

२२-९-३२

# अभिप्राय.

भारताचार्य रा. ब. **चिं. वि. वैद्य**:—

श्रीमती काशीबाई नाटेकर यांनीं केलेल्या कविता मीं वाचल्या. त्या फार मनोहर आहेत. कवयित्रीची नैसर्गिक प्रतिभा खरोखर फार मोठी आहे. साध्या सृष्टींतलि वस्तूंवर व प्रसंगावर इतक्या उदात्त आणि गोड कल्पना मीं आजवर कोठेंच पाहिल्या नाहींत. या सर्व नवीन पण मनास पटणाऱ्या कल्पना मोहक आहेत. उदा० ( ११ ) अर्धोन्मीलित गुलाब कलिका, ( ४ ) द्वितीयेस आणि पौर्णिमेस, ( २५ ) नलिनीस इषारा, इ. पहाव्या. शब्दरचनाही फार मधुर आणि विषयानुकूल अशीच आहे. शेवटीं कांहीं उच्च वेदान्त-विचारपरही कविता आहेत. जीर्ण पान पडतांना गरगर फिरतें हें सूक्ष्म निरीक्षण सूक्ष्म विचारयुक्त अभिनंदनीय आहे. ( गी० ४१ )

न्यायशास्त्री **भ. शं. सुखठणकर**, अध्यापक, सेंट झेविअर कॉलेज, मुंबई:—

आपलीं " गवाक्ष-गीतें " वाचून पाहिलीं. त्यांतील प्रत्येक गीत नैसर्गिक कवित्वशक्ति, विचारसारल्य व भाषालालित्य यांचें निदर्शक असलेलें पाहून कौतुक वाटतें. नेहमीं दृष्टीसमोर येणाऱ्या विषयांतून सरस असें प्रमेय शोधून काढून त्यानें वाचकांना मोहून टाकण्याची आपली हातोटी खरोखरीच वर्णनीय आहे. बालतरुणवृद्धांना रंजविणारें आपलें कवनमाधुर्य दिवसेंदिवस विकास पावून विशेष लोकादरास पात्र होवो असें इच्छितों.

अनुरूप चित्रसंग्रहानें गवाक्ष-गीताच्या सुवर्णाला सुवासाची मिळालेली जोड विशेष बहारीची झाली आहे.

प्रो. अ. बा. गजेंद्रगडकर, एम्. ए. एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई:—

श्रीमती काशीताई नाटेकर यांचा 'गवाक्ष गीत' या नांवाखालीं लवकरच प्रसिद्ध होणारा ४१ वैणिकांचा संग्रह मी वाचून पाहिला व या एकंदर संग्रहाबद्दल माझें फार अनुकूल मत झालें, हें लिहिण्यास मला आनंद वाटतो. यांतील कांहीं गीतें तर मला फारच आवडलीं. पहिलेंच गीत घ्या. त्या गीतांतील एकंदर कल्पना व त्यांत दिसून येणारा कवयित्रीचा विनय हीं किती आल्हादकारक वाटतात.

या संग्रहांतील सात आठ गीतें मुलांसंबंधींचीं आहेत. त्यांवरून कवयित्रीचें मुलांच्या मनोरचनेचें ज्ञान व्यक्त होतें. कांहीं गीतें निसर्गांत दिसून येणाऱ्या मनोवेधक चमत्कृतीवर प्रतिष्ठित झालेलीं आहेत. त्यावरून श्रीमती काशीताईंचें सूक्ष्म अवलोकन व कल्पनाशक्ति यांचा चांगलाच प्रत्यय येतो. निसर्गापासून मानवी जीवनाला अवश्य असें तत्त्वज्ञान शोधून काढावयाचें व त्याचे घुटके वाचकांस पाजावयाचे ही भारतीय कवींची फार प्राचीन कालापासून चालत आलेली प्रथा आहे. प्रस्तुत कवयित्रीनेंही ती प्रथा अनुसरली आहे. या दृष्टीनें 'बकध्यान' 'नलिनीस इषारा' 'पिकलें पान' हीं वैणिकें वाचनीय आहेत. या पैकीं 'नलिनीस इशारा' हें वैणिक मला फारच आवडलें. संस्कृतांत ज्यास अप्रस्तुतप्रशंसा किंवा मराठींत ज्याला अन्योक्ति म्हणतात त्या अलंकाराचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

आधुनिक काव्यांचा आवडता विषय जो प्रेम त्यावरही श्रीमती काशीताईंनीं चार–पांच गीतें रचलीं आहेत. 'प्रेम' या गीतांत प्रेमाचें स्वरूप मोठ्या कुशलतेनें रंगविलें आहे. 'अर्धोन्मीलित गुलाब–कलिका' या काव्यांत निसर्ग व प्रेम यांचा मनोहर संगम घडवून आणला आहे.

या संग्रहांतील सर्वच वैणिकांची भाषा सरल, सोपी व ओघवती आहे. काव्यगुणांपैकीं प्रसाद हा सर्वत्र दिसून येतो.

उत्कृष्ट काव्यांचें कारण सांगतांना दंडी म्हणतो—

'नैसर्गिकी च प्रतिभा श्रुतं च बहु निर्मलम्
अमन्दश्चाभियोगश्च कारणं काव्यसंपदः ॥'

या काव्यकारणाच्या तीन अंगांपैकीं नैसर्गिकी प्रतिभा श्रीमती नाटेकर यांच्यांत आहे हें या काव्यसंग्रहावरून स्पष्ट होतें. दुसऱ्या दोन अंगांकडे जर श्रीमती काशीताई जास्त लक्ष देतील तर त्यांच्या लेखणींतून यापेक्षांहि उत्तम काव्य निर्माण होईल व महाराष्ट्र कवयित्रींमध्यें निश्चित स्थान मिळेल याबद्दल मला बिलकूल संदेह वाटत नाहीं.

REFBK-CC04932
REFBK-0004932




Three Colour Blocks Printed by New Bharat Press